IndiaFirst LIFE INSURANCE

**Publication: Prahar** **Date: Friday, 31st January, 2015**

**Edition: Mumbai**

# ‘हॅप्पी इंडिया’साठी मुंबईतील ६ शाळांची निवड

**मुंबई :** देशाच्या विविध शाळांत ११ ते १६ वर्षे वयोगटांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ‘इंडिया फर्स्ट लाईफ इन्शुरन्सने राबवलेल्या हॅप्पी इंडिया लेखन प्रकल्पात मुंबईतील सहा शाळांची निवड करण्यात आली आहे. देशभरातील दीड लाख विद्यार्थ्यांनी यात सहभाग घेतला होता. यापैकी देशातील २५ शाळांची निवड झाली असून त्यातील सहा शाळा मुंबईतील आहेत. यात रायन इंटरनॅशनल, पोदार इंटरनॅशनल, डी. जी. खेतान इंटरनॅशनल स्कूल, बी. के. गाडिया ‘ए’ लेव्हल ज्युनियर कॉलेज आदी शाळांचा समावेश आहे. हॅप्पी इंडिया प्रकल्पात मुख्यतः शिक्षण, आरोग्य, ऊर्जा, संधारण, सुरक्षा, पर्यावरण आणि आर्थिक संरचना, स्वच्छता, बेरोजगारी आदी विषय विद्यार्थ्यांना देण्यात आले होते. ज्या विषयांवर विद्यार्थ्यांनी महत्त्वाचे आणि गंभीर मुद्दे मांडलेले आहेत त्या शाळांत विविध उद्योग, आरोग्य, शैक्षणिक संस्थांच्या प्रमुख पदाधिकारी, कार्यकारी अधिकारी आणि पदाधिकाऱ्यांचे मार्गदर्शनही उपलब्ध करून देण्यात येईल, अशी माहिती संस्थेचे विपणन अधिकारी मोहित रोचलानी यांनी दिली. ज्या शाळांची हॅप्पी इंडिया प्रकल्पात निवड झाली आहे त्यातील प्रत्येक शाळांना ५० हजार रुपयांचे मानधन देण्यात येणार असल्याचे रोचलानी यांनी सांगितले.

A Joint Venture of
Bank of Baroda Legal & General Andhra Bank